**L. C. BILL No. XIII OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १३ .**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

२०२५ चा महा. अध्या. १२.

१९५९ चा ३. १९६२ चा महा. ५.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

प्रकरण एक

## प्रारंभिक.

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

## महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाची सुधारणा.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १०-१क ची सुधारणा.

१९५९ चा ३.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश," महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम १०-१क मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतीलः-

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३०-१क ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३०-१क मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतीलः-

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सरपंच म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

प्रकरण तीन

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याची सुधारणा.**

१९६२ चा महा. ५.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १२क ची सुधारणा.

**४.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम १२क मधील, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील:-

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, परिषद सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ४२ ची सुधारणा.

**५.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ४२ मध्ये, पोट-कलम (६क) मधील, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील:-

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, अध्यक्ष म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ६७ ची सुधारणा.

**६.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ६७ मध्ये, पोट-कलम (७क) मधील, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील:-

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सभापती म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ याचे निरसन व व्यावृत्ती.

२०२५ चा महा. अध्या. १२.

**७.** (१) महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२५ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत अधिनियम, १९६१ यांच्या संबंधात तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) याची कलमे १०-१क व ३०-१क, आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याची कलमे १२क, ४२ व ६७ यांमध्ये अशी तरतूद आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या सदस्य किंवा परिषद सदस्याच्या जागेवर किंवा सरपंच, अध्यक्ष किंवा सभापती पदावर निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेली प्रत्येक व्यक्ती, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा. २३) याच्या तरतुदींनुसार व त्याखाली केलेल्या नियमांनुसार सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र, नामनिर्देशन पत्रासोबत सादर करील.

**२.** सन २०२५-२०२६ मध्ये, राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मोठ्या प्रमाणात घेतल्या जाणार आहेत. राखीव जागांसाठी अशा निवडणुका लढविण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी जात पडताळणी समित्यांकडे मोठ्या प्रमाणावर अर्ज प्राप्त होतील. त्यामुळे, अशा निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यापूर्वी जात पडताळणी समित्यांवर कामाचा अतिभार पडण्याची शक्यता आहे आणि प्रत्येक पाच वर्षांनंतर अशा निवडणुकांपूर्वी अशी स्थिती उद्‌भवू शकते.

जात पडताळणी समित्यांनी वैधता प्रमाणपत्र वेळेत न दिल्याच्या कारणामुळे राखीव जागांवर, अशा निवडणुका लढविण्याच्या संधीपासून संभाव्य उमेदवार वंचित राहू शकतात. राखीव जागांवर निवडणूक लढविणाऱ्या आणि ज्यांनी वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता जात पडताळणी समितीकडे अर्ज केलेले आहेत अशा व्यक्तींना त्या निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा देण्याकरिता, आणि तसेच अशा व्यक्तीने सहा महिन्यात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास त्यांच्या निवडणुका भूतलक्षी प्रभावाने रद्द झाल्याचे मानण्यात येईल अशी तरतूद करण्याकरिता, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटले.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (सन २०२५ चा महा. अध्या. १२) हा प्रख्यापित केला होता.

**४.** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १८ नोव्हेंबर, २०२५.

**जयकुमार गोरे,**
ग्रामविकास मंत्री.

## सन २०२५ चे वि.प. विधेयक क्रमांक १३
## महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२५.

### (महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यातील उतारे)

### (सन १९५९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३)

**१.** ते **१०.** ** ** **

**१०- १क.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल : राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

"परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांकरिता नामनिर्देशपत्र दाखल करण्याचा शेवटचा दिनांक हा, ३१ डिसेंबर २०२३ किंवा त्यापुर्वीचा असेल त्याबाबतीत, जीने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल, परंतु, जिला नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीच्या आत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील, याबद्दलचे हमीपत्र,सादर करील :

परंतु आणखी असे की, अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीच्या आत, वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह ठरेल.

**१० क.** ** ** **

**११** ते **३०.** ** ** **

**३०-१क.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या सरपंचाच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.". सरपंचाच्या राखीव पदाकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

"परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सरपंच पदाच्या निवडणुकीकरिता नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा शेवटचा दिनांक हा, ३१ डिसेंबर, २०२३ किंवा त्यापुर्वीचा असेल त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल, परंतु जिला नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतांच्या आत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र तो सादर करील, याबद्दलचे हमीपत्र, सादर करील :

परंतु आणखी असे की, अशा व्यक्तीने, निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीच्या आत, वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सरपंच म्हणून राहण्यास निरर्ह ठरेल.".

**३० क.** ** ** **

**३१** ते **१८८.** ** ** **

**अनुसूची** ** ** **

## (महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ यातील उतारे)

## (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५)

**१. ते १२.** ** ** **

"**१२क.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल : राखीव जागेकरिता निवडणूक लढविणा-या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणेः

"परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकांकरिता नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा शेवटचा दिनांक हा, ३१ डिसेंबर २०२३ किंवा त्यापूर्वीचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी, पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल, परंतु, जिला नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीच्या आत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील, याबद्दलचे हमीपत्र, सादर करील :

परंतु आणखी असे की, अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीच्या आत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तीची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती परिषद सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह ठरेल."

**१३. ते ४१.** ** ** **

**४२. (१) ते (६)** ** ** **

**(६क)** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या अध्यक्षाच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या 'प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.". अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक.

"परंतु, जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा शेवटचा दिनांक हा, ३१ डिसेंबर २०२३ किंवा त्यापूर्वीचा असेल त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल, परंतु, जिला नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीच्या आत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील, याबद्दलचे हमीपत्र, सादर करील :

परंतु आणखी असे की, अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीच्या आत, वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, अध्यक्ष म्हणून राहण्यास निरर्ह ठरेल."

**(७)** ** ** **

**४३.** ते **६६.** ** ** **

पंचायत समितीच्या सभापतीच्या निवडणुकीची कार्यपद्धती.

**६७. (१)** ते **(७)** ** ** **

"**(क)** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या सभापतीच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. ".

"परंतु, जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सभापती पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा शेवटचा दिनांक हा, ३१ डिसेंबर २०२३ किंवा त्यापूर्वीचा असेल त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल, परंतु, जिला नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत, -

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीच्या आत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील, याबद्दलचे हमीपत्र, सादर करील :

परंतु आणखी असे की, अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीच्या आत, वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सभापती म्हणून राहण्यास निरर्ह ठरेल.".

**(८)** ** ** ** **

**६८.** ते **२९०.** ** ** ** **

**अनुसूची** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १३.]**

**[ महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. जयकुमार गोरे,**

ग्रामविकास मंत्री.**]**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव (३),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

शासकीय मुद्रणालय, नागपूर.